सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन

विधि व न्याय विभाग

सन १९५३ चा मुंबई अधिनियम क्रमांक १७

# गांधी राष्ट्रीय स्मारक निधि (स्थानिक प्राधिकाऱ्यांच्या देणग्या) अधिनियम, १९५३

(दिनांक २६ जानेवारी, २०१६ पर्यंत सुधारित)

**Mumbai Act No. XVII of 1953**

# The Gandhi National Memorial (Local Authorities Donations) Act, 1953

(As modified upto the 26th January 2016)

व्यवस्थापक, शासकीय मुद्रणालय, वाई यांच्याद्वारे भारतात मुद्रित आणि संचालक, शासकीय मुद्रण व लेखनसामग्री, महाराष्ट्र शासन, मुंबई ४०० ००४ यांच्याद्वारे प्रकाशित.

२०१६

(किंमत रु. २०-००)

(सन १९५३ चा मुंबई अधिनियम क्रमांक १७)

# गांधी राष्ट्रीय स्मारक निधि ( स्थानिक प्राधिकाऱ्यांच्या देणग्या ) अधिनियम, १९५३

## अनुक्रमणिका


| | | |
|---|---|---|
| प्रास्ताविक | | पृष्ठ |
| कलमे | | |
| १. | लघु शिर्षक ... ... ... ... ... | १ |
| २. | व्याख्या ... ... ... ... ... | १ |
| ३. | स्थानिक प्राधिकाऱ्यांच्या हद्दीबाहेरील कारणांसाठी अंशदानाचा किंवा देणगीचा उपयोग करणे. | १ |

(सन १९५३ चा मुंबई अधिनियम क्रमांक १७)

## [गांधी राष्ट्रीय स्मारक निधि (स्थानिक प्राधिकाऱ्यांच्या देणग्या) अधिनियम, १९५३]

[२ मे १९५३]

**स्थानिक प्राधिकाऱ्यांनी गांधी राष्ट्रीय स्मारक निधीस दिलेली अंशदाने किंवा देणग्या यांचा, अशा स्थानिक प्राधिकाऱ्याच्या हद्दीबाहेर, उपयोग करण्याचा अधिकार देण्याबाबत अधिनियम.**

**ज्याअर्थी,** मुंबई राज्यांतील स्थानिक प्राधिकाऱ्यांनी, गांधी राष्ट्रीय स्मारक निधि म्हणून ओळखण्यांत येणाऱ्या निधीस दिलेली अंशदाने व देणग्या यांचा, अशा स्थानिक प्राधिकाऱ्यांच्या हद्दीबाहेर उपयोग करण्याचा अधिकार देण्याची तरतूद करणे इष्ट आहे; त्याअर्थी, यावरून पुढीलप्रमाणे विधि करण्यात येत आहे :—

लघु शिर्षक.

१. ह्या अधिनियमास गांधी राष्ट्रीय स्मारक निधि (स्थानिक प्राधिकाऱ्यांच्या देणग्या) अधिनियम, १९५३ असे म्हणावे.

२. ह्या अधिनियमात, विषयास किंवा संदर्भास बाध आणणारी कोणतीही गोष्ट नसेल तर, —

व्याख्या.

(१) "गांधी राष्ट्रीय स्मारक निधि" या संज्ञेचा अर्थ, भारतीय राष्ट्रीय काँग्रेसच्या अध्यक्षाच्या आश्रयाखाली सुरू करण्यात आलेला व गांधी राष्ट्रीय स्मारक निधि म्हणून ओळखण्यात येणारा निधि असा समजावा ;

१८८८ चा मुंबई ३. १९४९ चा मुंबई ४०. १९०१ चा मुंबई ३. १९२५ चा मुंबई १७. १९२३ चा मुंबई ६. १९३३ चा मुंबई ६.

(२) "स्थानिक प्राधिकारी" या संज्ञेचा अर्थ, मुंबई महानगरपालिका अधिनियम किंवा * मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम, १९४९ या अन्वये स्थापन केलेली महानगरपालिका, किंवा मुंबई जिल्हा नगरपालिका अधिनियम, १९०१ किंवा मुंबई महानगरपालिका बरो अधिनियम, १९२५ या अन्वये स्थापन केलेली नगरपालिका, किंवा मुंबई स्थानक मंडळे अधिनियम, १९२३, या अन्वये स्थापन केलेले जिल्हा स्थानिक मंडळ किंवा मुंबई ग्रामपंचायत अधिनियम, १९३३, या अन्वये स्थापन केलेली ग्रामपंचायत, असा समजावा.

स्थानिक प्राधिकाऱ्याच्या हद्दीबाहेरील कारणांसाठी अंशदानाचा किंवा देणगीचा उपयोग करणे.

३. कोणतीही नगरपालिका निधि किंवा स्थानिक निधि यासंबंधींच्या कोणत्याही विधींत काही असले तरी, ह्या अधिनियमाच्या सुरुवातीपूर्वी किंवा सुरुवातीनंतर गांधी राष्ट्रीय स्मारक निधीस स्थानिक प्राधिकाऱ्याने दिलेल्या आणि अशा स्थानिक प्राधिकाऱ्याच्या स्थानिक हद्दीबाहेरच्या एखाद्या कारणासाठी उद्देशासाठी किंवा हेतूसाठी उपयोगांत आणलेली किंवा उपयोगांत आणावयाची अंशदाने किंवा वर्गण्या उक्त कारणासाठी, उद्देशासाठी किंवा हेतूसाठी वैधरीतीने उपयोगांत आणल्या आहेत किंवा उपयोगांत आणण्याचा अधिकार आहे, असे समजण्यात येईल :

परंतु, ह्या कलमांतील कोणत्याही मजकूरामुळे, गांधी राष्ट्रीय स्मारक निधीच्या विश्वस्तांना, अशा स्थानिक प्राधिकाऱ्याने निर्दिष्ट केलेले कारण, उद्देश किंवा हेतू यांच्या व्यतिरिक्त इतर कारणासाठी, उद्देशासाठी किंवा हेतूसाठी अशा अंशदानाच्या किंवा देणगीच्या रकमेचा उपयोग करण्याचा अधिकार मिळणार नाही किंवा त्यामुळे अधिकार मिळाला आहे असे समजता कामा नये.

---

[१] उद्देश व कारणे यांच्या निवेदनांसाठी **५६ मुंबई शासन राजपत्र**, १९५३, भाग पाच, इंग्रजी पृ. २७ पहा.

* आता महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम (पहा सन २०१२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २३.)

शा. मु. वाई–२ पानी २,५०० पु.–२-२०१६–एच-७९*

## महाराष्ट्र शासनाची प्रकाशने मिळण्याची ठिकाणे

- **संचालक**
  मुद्रण, लेखनसामग्री व प्रकाशन संचालनालय,
  महाराष्ट्र राज्य
  नेताजी सुभाष मार्ग, मुंबई–४०० ००४.
  फोन : ०२२/२३६ ३२६ ९३, २३६ ३०६ ९५,
  २३६ ३११ ४८, २३६ ३४० ४९

- **व्यवस्थापक**
  शासकीय फोटोझिंको मुद्रणालय व ग्रंथागार
  फोटोझिंको मुद्रणालय आवार,
  जी. पी. ओ. नजिक, पुणे–४११ ००१.
  फोन : ०२०/२६१ २५८ ०८, २६१ २८९ २०

- **व्यवस्थापक**
  शासकीय मुद्रणालय व ग्रंथागार
  सिव्हील लाईन्स, नागपूर–४४० ००१.
  फोन : ०७१२/२५६ २६ १५, २५६ २८ १५

- **सहाय्यक संचालक**
  शासकीय लेखनसामग्री व ग्रंथागार
  पैठण रोड, रेल्वे स्टेशन,
  औरंगाबाद–४३१ ००१.
  फोन : ०२४०/२३३ १४ ६८, २३३ ११ ०९

- **व्यवस्थापक**
  शासकीय मुद्रणालय व लेखनसामग्री भांडार,
  ताराबाई पार्क,
  कोल्हापूर–४१६ ००३.
  फोन : ०२३१/२६५ ०३ ९५, २६५ ०४ ०२

**महाराष्ट्र शासनाच्या प्रकाशनाचे अधिकृत विक्रेते**